


राजू परुळेकर


**सद्दाम हुसेन हे अत्यंत आक्रमक आणि असंस्कृत होते हे मानणं अज्ञानाचं आणि अमेरिकन खोट्या प्रचाराला बळी पडल्याचं लक्षण आहे. मुळात ते आधुनिक पुरोगामी नेते होते ज्यांनी पाश्चात्त्य न्यायव्यवस्था इराकभर लागू केली.**



सद्दाम हुसेन यांची फाशी जगभर टी.व्ही. संचावर दाखविण्यात आली. कोणत्याही सुसंस्कृत माणसाच्या अंगावर शहारे आणणारं ते दृश्य होतं. सद्दाम हुसेन हे एक अत्यंत कठोर हुकूमशहा होते. त्यांनी त्यांच्याविरुद्ध इराकमध्ये उठणारा प्रत्येक आवाज अत्यंत क्रूरपणे दडपून टाकला. त्यात अनेक इराकी शिया मुसलमानांचे आणि कुर्दीश इराकींचे बळी गेले हे सत्य कुणालाच नाकारता येणार नाही. परंतु जगातली कुठलीच आणि कोणत्याही पद्धतीची सत्ता कठोरतेशिवाय राबवता येणारच नाही. अमेरिका किंवा भारतासारख्या लोकशाही देशातही हे पूर्णतः सत्य आहे. ज्या फुटीर गटांविरुद्ध सद्दामच्या शासनयंत्रणेने दमनाचा बडगा उगारला होता त्यांची पार्श्वभूमी ही फुटिरांची होती. काही प्रमाणात हा फुटिरांचा प्रश्न आपल्याकडच्या काश्मीर प्रश्नासारखाच होता हेही आपण लक्षात घ्यायला हवं. जर सद्दामच्या फाशीसाठी त्याने कुर्दीश शहर 'हलाबजा'वर हल्ला केला तो अन्याय्य होता असं जे न्यायालयाने म्हटले आहे ते आपणही मान्य केलं तर काश्मीरमध्ये आपण तैनात केलेली सेना आणि त्यामुळे होणारे मृत्यू हे सुद्धा 'गुन्हा' या सदरात मोडतील, हे आपण नीट लक्षात घ्यायला हवं. अमेरिका तिला हवं तेव्हा काश्मीरप्रकरणी भारताच्या कुठच्याही पंतप्रधानाला मानवताविरोधी ठरवून फासावर लटकवू शकते ही या प्रकरणाची तार्किक साखळी आहे. सद्दाम हुसेन यांनी सातत्याने काश्मीर प्रश्नावर भारताच्या बाजूची आंतरराष्ट्रीय मंचावर आग्रही पाठराखण केली याचं कारण खरोखरीच या मुद्यावर भारत आणि इराक हे एकाच बोटीत होते हे आहे.

मुळात सद्दाम हुसेन हे एक अत्यंत आक्रमक आणि असंस्कृत होते असं मानणं हे मूलतःच चुकीचं, अज्ञानाचं आणि अमेरिकन खोट्या प्रचाराला बळी पडल्याचं लक्षण आहे. मुळात सद्दाम हुसेन हे एक अत्यंत आधुनिक आणि पुरोगामी नेते होते. सद्दाम हुसेन यांनी सत्ता संपूर्णपणे हस्तगत केल्यावर शरीयतवर आधारित कायदा व्यवस्था इराकमधून पूर्णपणे हद्दपार केली. पाश्चात्त्य पद्धतीची न्यायव्यवस्था

## अखेरचे क्षण!



मागील वर्षाच्या अखेरीस सद्दामच्या फाशीच्या बातमी प्रसिद्धी माध्यमांची शीर्षकं सजलेली होती. ज्या हुकूमशहाने इतका नरसंहार केला तो आपल्या मृत्यूला कसा सामोरा गेला याचं कुतूहल जगभर होतं.

मात्र सद्दाम हुकूमशहासारखाच मेला.

सद्दामला फाशी देण्यासाठी निळसर-करड्या रंगाची काळकोठडी तयार करण्यात आली होती. मात्र फाशीच्या झटक्याची झडप मात्र लालभडक रंगाची होती. सद्दामला फाशी देण्यासाठी नेणाऱ्या इराकी सरकारच्या पदाधिकाऱ्यांनी अमेरिकन जर्किन घातली होती. ते सद्दामला अखेरच्या क्षणी हिणकसपणे वागवत नव्हते. त्यांची हाताळणी सावकाश होती. आपले चेहरे त्यांनी मुखवट्याआड ठेवले होते. पण सद्दाम हुसेन याने मात्र फाशी जाताना बुरखा घालून घेण्यास नकार दिला. त्याने आपल्या पायाला दोरीने करकचून बांधण्याची आवश्यकता नाही असे सांगितले. प्रथम त्याच्या मानेला काळ्या कपड्याने झाकण्यात आले आणि एक जाडजूड फाशीचा दोर त्याच्या गळ्याभोवती आवळण्यात आला. पण सद्दाम या सगळ्याला धैर्याने सामोरा गेला. मृत्यूचं कुठलंही भय त्याच्या चेहऱ्यावर दिसत नव्हतं. तो कोलमडून गेल्याचंही दिसलं नाही. त्याने कुठलाही विरोध दर्शवला नाही. त्याला फाशी देण्यासाठी नेणाऱ्या रुबाई नावाच्या पदाधिकाऱ्याकडे तर सद्दामने एकदा शांतपणे वळून बघितले. जणुकाही तुम्ही घाबरताय का, अशा आशयाचं तो काही बोलत होता.

या फाशीच्या शिक्षेचा अंमल करण्यासाठी मुनीर हद्दाद या न्यायाधीशाची इराक सरकारतर्फे नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी सद्दामच्या शिक्षेच्या प्रक्रियेच पर्यवेक्षण केलं. सद्दामच्या हातात कुराणची एक प्रत होती. ती त्याच्या पश्चात कुणाकडे हस्तांतरित करावी याबद्दल सद्दामकडून लेखी निर्देशन घेण्यात आले. सद्दामकडून त्याची शेवटची इच्छाही वदवून घेण्यात आली. सद्दाम आपल्या अखेरीस म्हणाला... 'तुम्ही सारे एकत्र याल ही अपेक्षा आहे. इराणवर मात्र विश्वास ठेवू नका. ते धोकादायक आहेत. मी कुणालाही घाबरत नाही.' हा शेवटचा टोमणा इराकच्या आघाडी सरकारचे पंतप्रधान नूरी अल मलिकी यांना उद्देशून होता.

सद्दाम हुसेन याच्या फाशीची शिक्षा त्यानंतर अमलात आली. सद्दाम हुसेन याला लगेच मृत्यू आला.

सद्दामच्या फाशीचे प्रक्षेपण उपग्रह वाहिन्यांवर होत असताना इराकी टीव्हीवर सद्दामच्या अत्याचाराच्या क्लिपिंग्ज दाखवल्या जात होत्या. सद्दामचे सैनिक कैद्यांना कसे मारतात आणि प्रेतांच्या राशीवर

---

इराकभर लागू केली. उद्योगधंद्यात आणि सरकारी नोकऱ्यांत मोठ्या प्रमाणात स्त्रियांची भरती केली. त्यांना बुरख्यातून आणि चूल व मूल या धार्मिक जोखडातून मुक्त केलं हे सौदी अरेबिया आणि इराणसारखे देश आजूबाजूला असताना करणं जवळजवळ अशक्यप्राय आणि म्हणूनच आश्चर्यकारक होतं.

इराक आणि इराण यांच्यातला संघर्ष आणि त्यातून १९८० ते १९८८ इतका प्रदीर्घ काळ चाललेलं युद्ध हे सुद्धा इराणचे शहा मोहम्मद रझा पहेलवी यांना सत्ताभ्रष्ट करून सत्तेवर आलेले इराणी मूलतत्त्ववादी आयातुल्ला खोमोनी यांच्या वैचारिक भूमिकेचा व त्यामागे मध्य पूर्वेत उभ्या राहात असलेल्या शियापंथीय मुसलमानांच्या आंदोलनाचा इराकच्या सार्वभौम सत्तेला धोका निर्माण झाला होता. एकत्र पद्धतीने हा आधुनिक आणि पुरोगामी विचारपद्धतीच्या आणि न्यायव्यवस्थेच्या रक्षणाचा लढा होता. इराणमध्ये आयातुल्ला खोमोनींचं सरकार इराकमधल्या बहुसंख्य शियांना उकसवणाऱ्या वृत्तीचं प्रतीक होतं. कुर्दीशांबाबतही हेच सत्य होतं. त्यामुळे सद्दाम हुसेन यांना हा दुहेरी लढा त्यांच्या कारकीर्दीत लढावा लागला हे अपरिहार्य होतं. याची दुसरी बाजू आर्थिक होती. पण ती लक्षात घेण्याअगोदर हे सुद्धा लक्षात घेतलं पाहिजे की या संपूर्ण युद्धकाळाला अमेरिकेने सद्दाम हुसेन आणि त्यांच्या इराकला हत्यारं आणि औषधं व इतरही मदत केलेली होती. या व्यतिरिक्त (तत्कालीन) सोविएत युनियन आणि फ्रान्ससारखे देशही सद्दाम हुसेन यांच्यामागे भक्कमपणे उभे राहिले होते. याचं स्मरण अशासाठी करायचं की, तेव्हा त्यांना सद्दाम हे मानवताविरोधी वाटले नव्हते किंवा त्यांना हत्यारं पुरवताना हे काही 'दुरुपयोग' करतील असंही त्यांना वाटलं नव्हतं.

संपूर्ण अरब जगाचे सद्दाम हे हीरो होते. इराक - इराण युद्धात





वरून कसे त्यांना मारून टाकले जात असे याची आवर्जून उजळणी केली गेली. फाशीच्या शिक्षेच्या पार्श्वभूमीवर सद्दाम हुसेन याचे उदात्तीकरण होऊ नये याची काळजी इराक सरकारने घेतली.

अमेरिकन जेलरने फाशी आधी इराक सरकारकडे अधिकृतपणे सद्दामचा कब्जा दिला. त्याव्यतिरिक्त या प्रक्रियेत कुठेही अमेरिकन अधिकारी दिसला नाही. फाशीच्या शिक्षेची ही संपूर्ण प्रक्रिया इराकी कायद्यानुसार होती असे न्यायाधीश मुनीर हद्दादी यांनी नंतर सांगितलं. ■

अरब देशांकडून खोमेनींची प्रचंड मोठी क्रांती लाट थोपविण्याकरिता सद्दामना अरब देशांकडून मोठी आर्थिक मदत देण्यात आली होती. सद्दाम यांच्या म्हणण्याप्रमाणे खोमेनीप्रणीत शियापंथीयांची क्रांतीची लाट थोपविण्याकरिता व तिच्याकडून अरब देशांचं रक्षण करण्याकरिता इराकने युद्ध करून बलिदान केलेलं होतं. त्यासाठी अरब देशांनी इराकला देण्यात येणाऱ्या मदतीतला आपला वाटा उचलायला हवा होता. सद्दाम यांचं सत्तापतन करण्याकरता अमेरिकेला इराक - कुवेत युद्धाचं कारण मिळालं. त्याची पार्श्वभूमी ही अशीच होती. इराकने इराणविरुद्ध युद्ध केल्यामुळे कुवेतवरचा इराणचा संभाव्य हल्ला टळला असा सद्दाम यांचा दावा होता. (जो बऱ्याच अंशी खरा होता.) त्यामुळे या इराण- इराक युद्धामध्ये इराकला झालेली प्रचंड कर्जे ही संयुक्त जबाबदारी ठरत असून कुवेतने इराकचं तीस दशलक्ष डॉलर्सचं कर्ज माफ करावं अशी सद्दाम यांची इच्छा होती. पण कुवेतने तसं करायला नकार दिला. उलट आंतरराष्ट्रीय बाजारात मोठ्या प्रमाणावर तेल उतरवण्यास सुरुवात केली. ज्यामुळे तेलाचे भाव उतरू लागले. जे इराकला नको होतं. कारण इराकला आपली कर्जे फेडायची असल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे भाव चांगले असणं ही इराकची गरज पुढे भडकलेल्या इराक - कुवेत या संघर्षाची पार्श्वभूमी ही अशी होती. याही काळात (१९९०) अमेरिका कोट्यवधी डॉलर्सची मदत इराकला करतच होती. १९९० च्या जुलैमध्येही अमेरिकेचे इराकमधले राजदूत हे इराकसोबत अमेरिकेच्या मधुर संबंधांचीच ग्वाही देत होते. शिवाय तत्कालीन अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश (सीनियर) व तत्कालीन अमेरिकन सेक्रेटरी ऑफ स्टेट जेम्स बेकर सैन्यबळ वापराच्या विरोधात अमेरिका असल्याचे व कुवेत-इराक सीमाप्रश्नात अमेरिका







सामील होणार नसल्याचंच जाहीर करत होते. यातली दोन उदाहरणे तर एकदम ढळढळीत आहेत. पहिलं म्हणजे कुवेतमध्ये अमेरिकन सेना शिरल्यावर सुरुवातीला अमेरिकन अध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू बुश (सीनियर) यांनी सामोपचाराचंच बोलणं चालू ठेवलं होतं. किंवा त्या आधी ज्या कुर्दीश हत्याकांडाचं निमित्त साधून सद्दामना अमेरिकेने फासावर चढवलं त्या

हत्याकांडामागे इराणचा हात असल्याचं तेव्हा इराकने अधिकृतपणे जाहीर केलं, त्यावर आजतागायत एकही अमेरिकन विश्लेषक ते इराकी म्हणणं खोडून काढू शकला नाही.

सोविएत युनियनची ताकत लुळी पडल्यावर व रशियाच अमेरिकेच्या ताटाखाली आल्यावर अमेरिकेला मध्यपूर्वेतला तेलाचा वास अस्वस्थ करू लागला. अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू बुश (ज्यु.) यांचा तर या व्यवसायाशी व्यावसायिक म्हणूनच संबंध आहे. रशियाचा कुवेतप्रकरणी अमेरिकेला (मजबुरीने) पाठिंबा मिळाल्यावर मध्यपूर्वेतले आर्थिक हितसंबंध जपण्याकरिता अमेरिकेला सद्दाम हुसेनचा अनुनय करण्याची गरज संपली. सौदी अरेबिया ते कुवेतपर्यंतचे सर्व तेलक्षेत्र हे अमेरिकेच्या ताटाखालचे मांजर होतेच. राहता राहिले सद्दाम हुसेन. ते आता अमेरिकेला स्वत:च्या तेलाच्या साम्राज्यवादी हितसंबंधातले काटे वाटू लागले.


कुवेत प्रकरणानंतर अमेरिकेने सद्दाम हुसेन यांच्यावर अनेक खोटे आरोप केले. त्यातले बरेचसे आरोप हे गावपातळीवरच्या गुंडांनी एकमेकांवर करावेत असे होते. उदाहरणार्थ, सद्दाम हुसेन यांचे आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांशी संबंध आहेत हा आरोप.


क्षणापर्यंत निभावली त्या मैत्रीला भारताच्या परराष्ट्र धोरणाने कृतघ्नतेचे नख लावले. यानंतर आंतरराष्ट्रीय पातळीवर असा 'संधिसाधू' मित्र किती विश्वासार्ह ठरवणार?

सर्वात महत्त्वाचं म्हणजे अमेरिका-ब्रिटन ज्या मध्ययुगीन पद्धतीने दुसऱ्या देशांच्या राष्ट्राध्यक्षांना खोटी न्यायालयं उभारून, लुटूपुटुचे न्याय करत फासावर लटकवत जगाला त्याची दृश्य दाखवत सुटलेले आहेत त्या मालिकेचा सद्दाम हुसेन हा शेवट असणार नाही. ही तर केवळ सुरुवात आहे. वास्तविक पाहता खोटे आरोप आंतरराष्ट्रीय पातळीवर करून लक्षावधी निरपराधांची बॉम्बवर्षावात हत्या करण्याचा खटला जर खरोखर निष्पक्षपणे चालवला तर अमेरिकेच्या अध्यक्षांना आणि ब्रिटनच्या पंतप्रधानांना तत्काळ फासावर जावे लागले. प्रश्न हाच आहे की, ते फासावर जाताना सद्दाम यांच्यासारखे धैर्य दाखवतील का?

भारतापुरतं बोलायचं झालं तर भारत सद्दाम यांच्याबाबत तटस्थ राहून अमेरिका-ब्रिटनच्या अधिपत्याच्या हाकेपासून मुक्त राहू शकणार नाही. आता भारताने अमेरिकेबरोबर अणुकरार केलेला आहे. भारतीय सार्वभौमत्वात अमेरिकेला ढवळाढवळ करण्याचा हा

**अमेरिका-ब्रिटन ज्या मध्ययुगीन पद्धतीने दुसऱ्या देशांच्या राष्ट्राध्यक्षांना खोटी न्यायालयं उभारून, लुटूपुटुचे न्याय करत फासावर लटकवत जगाला त्याची दृश्य दाखवत सुटलेले आहेत त्या मालिकेचा सद्दाम हुसेन हा शेवट असणार नाही. ही तर केवळ सुरुवात आहे.**





वास्तविक ओसामा बिन लादेन किंवा तालिबानी राजवट ही अत्यंत प्रतिगामी आणि मूलतत्त्ववादी होती. ज्या प्रकारच्या राजवटीची बीजं खोमेनीप्रणीत क्रांतीत होती. म्हणून सद्दामनी एक युद्धही लढले होते. शिवाय या प्रकारचे सद्दाम यांचे कुणाही अतिरेकी गटाशी संबंध नव्हते. जे नंतर स्पष्ट झालंच. अमेरिकेने मोठा विध्वंस करणारी हत्यारं आणि अण्वस्त्रं सद्दाम यांनी बनवून ती लपवून ठेवल्याचा आरोप केला. तो अत्यंत हास्यास्पद आणि बिनबुडाचा होता. या साऱ्या बालिश, उथळ क्रौर्यात ब्रिटन आणि ब्रिटनचे पंतप्रधान टोनी ब्लेअर हे सुद्धा तितक्याच उत्साहाने सामील होते. वास्तविक एका समृद्ध देशाचे लचके तोडून त्या देशाची लुट करणारे हे वाटमारू होते. भारत नेहमीप्रमाणेच ना इथला ना तिथला असा 'मधला' होता. सद्दाम यांनी ज्या भक्कमपणे भारताशी मैत्री सत्तेवर असतानाच्या अखेरच्या

एकतर्फी परवाना मिळालेला आहे. दबक्या पावलांनी अमेरिकी लालसेची ही सुरुवात आहे. थोड्याच काळात पावलं दबकी राहणार नाहीत. बूट धाडधाड वाजू लागतील. कुणाच्याही दरवाजावर थाप पडेल. 'अमेरिकाविरोधी' म्हणून त्याला घरातून नाहीसं करण्यात येईल. जाहीर फासावर लटकविण्यातही येईल. तो 'कुणीतरी' देशाचा पंतप्रधान असू शकेल. सगळं जग तेव्हा श्वास रोखून मनातल्या मनात तळमळत अमेरिका-ब्रिटनला घाबरून गप्प बसलेलं असेल. जसं सद्दामना फासावर जाताना पाहून आपण बसलो. सद्दाम तिक्रीत या त्यांच्या गावी जमिनीखाली चिरनिद्रेत गेले. ते सुटले. आपण अजून 'अमेरिकन सेंचुरी'त जमिनीवर आहोत. प्रश्न पडतो भाग्यवान कोण? सद्दाम की आपण?

*rajuparulekar@hotmail.com*